# मराठी युवकभारती

| वेळ : ३ तास | ऑक्टोबर - २००८ | एकूण गुण : ८० |
|---|---|---|

**प्रश्न १. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर सुमारे २५० ते ३०० शब्दांत निबंध लिहा :** **(१०)**

(१) विज्ञानाची गरुडझेप (२) आई थोर तुझे उपकार (३) सूर्य उगवला नाही तर

(४) माजी सैनिकाचे आत्मवृत्त (५) दूरदर्शनवरील जाहिराती

**प्रश्न २. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा :** **(८)**

(१) अहिल्याबाई होळकर यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये लिहा.

(२) केरूनानांनी आपल्या मुलींना स्वसंरक्षणार्थ मर्दुकीचे धडे कसे दिले ?

(३) लेखकाने छत्रपती शाहू महाराजांना 'आभाळाएवढा छत्रपती' असे म्हटले आहे ?

प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा : (८

(१) परमेश्वर कोणा एका व्यक्तीला शास्त्राचे निरूपण पुन्हा पुन्हा का करीत आहे ?

(२) दुर्गा भागवत यांच्या मते फुलांचे सामर्थ्य कशात आहे ?

(३) 'ट्रोजन हॉर्स' संबंधी डॉ. फ्लेमिंग यांनी काय सांगितले ?

(४) स्मॉल कॉज कोर्टात डॉ. नरेंद्र जाधव यांच्या आईला कोणता अनुभव आला ?

प्रश्न ४. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा : (८

(१) 'परब्रह्म निष्काम' या गौळणीत श्रीकृष्णाच्या बाललीलांचे वर्णन कसे आले आहे ?

(२) सावरकरांच्या उत्कट देशभक्तीचे दर्शन 'सागरास' या कवितेतून कशा प्रकारे घडते ?

(३) नीळकंठ महाजन यांनी निसर्ग आणि माणूस यांचा ऋणानुबंध कसा स्पष्ट केला आहे ?

प्रश्न ५. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे ८० शब्दांत लिहा : (४

(१) संत मुक्ताबाईंनी संत ज्ञानेश्वरांची समजूत कशी घातली ?

(२) कवी वसंत सावंत यांनी कोकणातील वर्षाकालीन निसर्गाची कोणकोणती रूपे टिपली आहेत ?

(३) कवी नामदेव ढसाळ यांना प्रियेविषयी कोणती आठवण होते ?

प्रश्न ६. (क) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> वाक्यातील आशयसौंदर्य स्पष्ट करा : (४

(१) "महाकाव्याचा विषय व्हावा असे जीवन दोघेही जगले."

(२) जग ही बंदिशाळा नसून व्यापक अनुभवांची ती कार्यशाळा आहे.

(३) "त्यांना क्षमा करणं हीच त्यांना मोठी शिक्षा ठरेल."

(ख) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा : (४

(१) हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरी ।
मठाची उठाठेव कां तरी ।।

(२) खांद्यावर बाळगिले ओझे सुखदु:खांचे
फेकुन देऊन अता परत चाललो !

(३) पण पुढे अबाधित राहील तिचं
हे टिकलीबांगडीचं
चिमूटभर स्वातंत्र्य ....... ?

(ग) (१) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा : (२

(१) यशवंतराव चव्हाण यांच्या मते लोकांच्या प्राथमिक गरजा कोणत्या ?

(२) तानूच्या मोठ्या भावाचे नाव काय होते ?

(३) डॉ. सलीम अली यांचे गाव कोणते ?

(४) 'भूमिपुत्राचा वारसा' या पाठाचे लेखक कोण ?

(२) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा : (२

(१) संत नरहरी सोनार यांना आकाशात काय दिसते ?

(२) कवी मर्ढेकरांच्या मते भांडवली वृत्तीचा परिणाम काय होतो ?

(३) कवी दिलीप चित्रे यांच्या लहानपणापासूनचा वड का तोडला गेला ?

(४) दासू वैद्य यांच्या मते हल्लीची मुले कोणता खेळ खेळतात ?

प्रश्न ७. (क) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे १०० शब्दांत लिहा : (

(१) 'त्याग' कथेतील नायिकेने कोणता त्याग केला ?

(२) पिराजीच्या घरची परिस्थिती कशा प्रकारची होती ?

(३) आपल्या अस्तित्वासाठी चंद्रकलेने कोणाकोणाशी व कसा संघर्ष केला ?

**(ख) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे ६० शब्दांत लिहा :** (

(१) नर्मदा आपल्या मुलांविषयी समाधानी का नव्हती ?

(२) स्वैपाकाच्या बाईंची, राजा कुत्र्याशी, कशा प्रकारची वागणूक होती ?

**प्रश्न ८.(१) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> अलंकाराचे लक्षण सांगून उदाहरण लिहा :** (

(१) व्यतिरेक (२) श्लेष

**(२) कंसातील सूचनेनुसार कोणत्याही <u>दोन</u> वाक्यांचे रुपांतर करा :** (

(१) आज जेव्हा मी माहेरी जाते, तेव्हा सर्व भावंडं माझ्याशी व्यवस्थित बोलतात. (*केवल वाक्य करा.*)

(२) त्यांचा तालावर पाकोळ्या नाचतात आणि पाखरे त्यांची साथ करतात. (*मिश्र वाक्य करा.*)

(३) राज्य साहेबांचं, परंतु सत्ता नोकरशाहीची. (*वाक्यप्रकार ओळखा*)

**(३) खालीलपैकी कोणत्याही <u>चार</u> पारिभाषिक शब्दांचे अर्थ लिहा :** (

| | | |
|---|---|---|
| (१) Agenda. | (२) Data. | (३) Head line. |
| (४) Journal. | (५) True copy. | (६) Vacancy. |

**(४) खालीलपैकी कोणतेही <u>एक</u> वाक्य लेखननियमांनुसार शुद्ध करून लिहा :** (

(१) पाश्चात्त दुदेशीचा माणूस तो.

(२) तुमचा पुर्नजन्मावर वीश्वास आहे का ?

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करुन वाक्य पुन्हा लिहा :**

(१) करतील तेवढंच काम पण मनजोगतं दाम आणि पोटभर अन्न मिळू लागलं

(२) यानाला एक्स हे नाव देण्यात आले होते

**(५) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> वाक्प्रचारांचा अर्थ सांगून स्वत:च्या वाक्यांत उपयोग करा :** (२

(१) पाळत ठेवणे. (२) तोंडाला काळे फासणे. (३) स्तोम माजविणे. (४) मान तुकवणे.

**प्रश्न ९.(क) खालीलपैकी कोणतेही <u>एक</u> पत्र लिहा :** (४

(१) रस्त्यांतील खड्ड्यांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी रस्ते दुरुस्त करण्याविषयी महानगर पालिकेच्या संबंधि अधिकाऱ्यास पत्र लिहा.

(२) महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश मिळावा यासाठी विनंती करणारे पत्र प्राचार्यांना लिहा.

**(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :** (३

शिक्षणात सर्वांत महत्त्वाचे आहे ते म्हणजे शिकू पाहणारे 'मूल,; म्हणून त्याचा विचार शिक्षणाच्या केंद्रस्थानी असणे अत्यावश्यक आहे. त्याचे वय, आवडीनिवडी, क्षमता, त्याचे हळुवार मन, एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून असलेले त्याचे अस्तित्व व हक्क, कुटुंबातून बाहेर पडल्यानंतर समाजाशी जुळणारे वा न जुळणारे त्याचे नातेसंबंध, परिसराला समजावून घेण्याची त्याची क्षमता यांचा विचार व्हावा व त्यानुसार त्याच्यापुढे ज्ञान ठेवावे. मूल आपल्या परीने ते ज्ञान ग्रहण करत असते; त्याचा अर्थ लावत स्वत:त बदल घडवत असते. प्रथम एका गोष्टीचा ठळक दिसणारा एकच अर्थ त्याला लावत येतो. नंतर एका घटनेच्या दोन तर्कसंगती त्याच्या लक्षात येऊ लागतात. पियाजेच्या या तत्त्वाचा विचार, मुलाला शिक्षण देत असताना अधिकत्वाने करावा लागतो.

**प्रश्न :** (१) लेखकाच्या मते शिक्षणप्रक्रियेत सर्वांत महत्त्वाचा घटक कोणता ? (१

(२) मूल स्वत:च्या परीने शिक्षणात कसे सहभागी होते ? (१

(३) वरील उताऱ्यास समर्पक शीर्षक द्या. (१

**किंवा**

**वरील गद्य उताऱ्याचा सुमारे एक-तृतीयांश (१/३) एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

(ग) **खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर निमंत्रणपत्रिका लिहा :** (३)

(१) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ.

(२) विद्यार्थी ग्राहक भांडाराचे उद्‌घाटन.

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर कार्यक्रमपत्रिका तयार करा :**

(१) तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षकांचा निरोप समारंभ.

(२) आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्वस्पर्धा.

**किंवा**

**वृत्तपत्रासाठी कार्यक्रमाचा वृत्तांत तयार करा :**

तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयात झालेल्या 'वृक्षारोपण' कार्यक्रमाचा वृत्तांत वृत्तपत्रासाठी तयार करा.

❖ ❖ ❖